# वसंतरावनाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
VasantraoNaikMarathwadaKrishiVidyapeeth, Parbhani
कृषि नगर, वसमत रोड,परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)
Krushi Nagar, VasmatRaod, Parbhani- 431 402 (Maharashtra)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


**वाचा:** १. महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०३.०७.२०२३

२. विद्वत परिषद ११७ वी दि.०७.०८.२०२३ मधील ठराव क्र.वि.६४/११७/०९.०८.२०२३

३. कार्यकारी परिषद २११ मधील ठराव क्र.का-९६/२११/२१.०८.२०२३ दि.२१.०८.२०२३

**कनिष्ठ संशोधन सहायक व वरिष्ठ संशोधन सहायक या सवंर्गाचे सेवाप्रवेश नियम प्रसिध्द करणे बाबत.**

## विद्यापीठ परिपत्रक

**जा.क्र.२०२३/सेप्रनि/आस्था-२/**4954 **दि.०७.११.२०२३**

विद्यापीठातील कनिष्ठ संशोधन सहायक, वरिष्ठ संशोधन सहायक (कृषि), वरिष्ठ संशोधन सहायक (अन्नतंत्र), वरिष्ठ संशोधन सहायक (अभियांत्रिकी), वरिष्ठ संशोधन सहायक (जैवतंत्रज्ञान) या संवर्गाचे सरळसेवा /पदोन्नतीचे सेवाप्रवेश नियम याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहेत.

सदर सेवाप्रवेश नियमाच्या संबंधित काही आक्षेप असल्यास पुराव्यासह थेट या कार्यालयास दिनांक १७.११.२०२३ पुर्वी सादर करावेत. जेणे करून सदर आक्षेपाचा विचार करून त्यामध्ये सुधारणा करण्यात येवून अंतिम सेवाप्रवेश नियम प्रसारीत करण्यात येतील.

**मा.कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने...**

**(पु.को.काळे)**
**कुलसचिव**

**प्रतिलिपी:**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण),वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव.

**प्रत:**

१. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक व त्यासोबत देण्यात आलेले कनिष्ठ संशोधन सहायक , वरिष्ठ संशोधन सहायक (कृषि), वरिष्ठ संशोधन सहायक (अन्नतंत्र), वरिष्ठ संशोधन सहायक (अभियांत्रिकी),वरिष्ठ संशोधन सहायक (जैवतंत्रज्ञान) या संवर्गाचे सरळसेवा /पदोन्नतीचे सेवाप्रवेश नियम विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

२. मा.कुलगुरु महोदय यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.

# वसंतराव नाईक मराठवाडा, कृषि विद्यापीठ, परभणी

## वरिष्ठ संशोधन सहाय्यक(कृषि) संवर्गाचे सरळसेवा प्रवेश नियम (Recruitment Rules) २०२३

| | | |
|---|---|---|
| १. | **संक्षीप्त नाव, प्रारंभ** | |
| | १) | या नियमांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील **"वरिष्ठ संशोधन सहाय्यक(कृषि)", गट-ब सरळसेवा प्रवेश नियम २०२३** असे संबोधण्यात यावे. |
| २. | **व्याख्या** – या नियमात संदर्भानूसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर – | |
| | २ | " **कृषि विद्यापीठ** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ नुसार अधिनियम केलेला आहे, त्याप्रमाणे असेल. |
| | ३ | " **शासन** " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा विद्यापीठासाठी असलेला मंत्रालय विभाग असा आहे; |
| | ४ | **मंत्रालयीन विभाग**- कृषि व पदूम मंत्रालय, महाराष्ट्र शासन |
| | ५ | " **कृषि परिषद** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ अन्वये स्थापन केलेली महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद असा आहे. |
| | ६ | " **अधिनियम** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ असा आहे व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | ७ | " **परिनियम** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० असा आहे व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | ८ | **"नियुक्ती प्राधिकारी"** याचा अर्थ विद्यापीठ अधिनियम व परिनियमानूसार मा.कुलगुरु, वनामकृवि, परभणी हे आहेत. |
| | ९ | " **कार्यकारी परिषद** " याचा अर्थ म्महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील अधिनियम क्र. ३० व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम क्र.३ मध्ये नमुद परिषद व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | १० | " **विद्वत परिषद** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील अधिनियम क्र.३३ व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम क्र.४ मध्ये नमुद परिषद व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | ११ | " **निवड समिती गट-ब** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील अधिनियम क्र.५८ व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम क्र. ७५ मध्ये नमुद केल्यानुसार व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह असे असेल |
| | १२ | " **विद्यापीठ सारसंग्रह** " याचा अर्थ विद्यापीठाने प्रदान केलेल्या अधिकारांची विभागणी व तरतुदी असा आहे व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |

| | | |
|---|---|---|
| | १३ | “ **पदव्युत्तर पदवी** ” याचा अर्थ सांविधिक मान्यता प्राप्त कृषि विद्यापीठातील कृषि शाखेतील संबंधित (एम.एस्सी.-कृषि/ एम.एस्सी उद्यानविद्या) विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असा आहे. |
| | १४ | “ **आचार्य पदवी** ” याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कृषि आचार्य पदवी असा आहे. |
| | १५ | “ **नेट** ” याचा अर्थ केंद्र शासनाने घोषीत केलेली राष्ट्रीय पात्रता परीक्षा असा आहे. |
| | १६ | “ **सेट** ” याचा अर्थ राज्य शासनाने घोषीत केलेली राज्य पात्रता परीक्षा असा आहे. |

३. **नियुक्तीचा मार्ग :-**

वरिष्ठ संशोधन सहाय्यक, गट-ब या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल.

(क) **नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीचा मार्ग :-**

विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने विद्यापीठ निवड समिती गट - ब मार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे गुणवत्तेनूसार शिफारस करण्यात आलेल्या **उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे**

(एक) **वयोमर्यादा :**

१) **किमान वयोमर्यादा** : १८ वर्ष पुर्ण

२) **कमाल वयोमर्यादा** : खुल्या वर्गातील व्यक्तीसाठी ३८ वर्ष पुर्ण व मागासवर्गीय व्यक्तीसाठी ४३ वर्ष पुर्ण

३) **महिला-** अराखीव उमेदवारासाठी ३८ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्ष

४) **खेळाडू** -उमेदवारासाठी अराखीव ४३ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्ष

५) **दिव्यांग-** अराखीव उमेदवारासाठी ४५ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४५ वर्ष

६) **अनाथ-** अराखीव उमेदवारासाठी ४३ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्ष

६) **वयोमर्यादेची गणना** : जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतीम दिनांकास उपरोक्त प्रमाणे नमूद केलेली किमान व कमाल वयोमर्यादा धारण केलेली असणे आवश्यक राहील.

७) शासनाने वेळोवेळी वयोमर्यादेत दिलेली सुट व विद्यापीठ कार्यकारी परिषदेने वेळोवेळी केलेले ठराव व नियम योग्य त्या फेरफारासह लागु राहतील.

(दोन) **शैक्षणिक अर्हता :**

१) Master’s degree in the respective Discipline मान्यता प्राप्त कृषि विद्यापीठातील कृषि शाखेतील संबंधित (एम.एस्सी.-कृषि/ एम.एस्सी उद्यानविद्या) विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण

४. **सरळसेवा नियुक्तीचे प्रमाण :-**

वरिष्ठ संशोधन सहाय्यक संवर्गातील एकूण मंजूर पदसंख्येसाठी, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण हे अनुक्रमे ५० : ५० टक्के असे राहील.

५. **विभागीय परीक्षेची तरतूद :-**

विद्यापीठाने विहित केलेली विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा संबंधित पदावर रुजू झाल्यानंतर ३ संधीमध्ये (मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४ संधीमध्ये) उत्तीर्ण करणे अथवा सुट प्राप्त करणे आवश्यक राहील. विहित कालावधी विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण / सूट प्राप्त न केल्यास संबंधिताच्या विहित संधीनंतर वेतनवाढी शासन नियमानुसार रोखण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| | | तसेच सदर विभागीय परीक्षा संबंधित कर्मचाऱ्याला संबंधित पदावरून नजीकच्या वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यासाठी एक अर्हता म्हणून घेण्यात येत असल्यामुळे ती उत्तीर्ण / सूट प्राप्त करणे बंधनकारक असेल. तसे केले नसल्यास संबंधिताचा पदोन्नतीकरीता विचार करण्यात येणार नाही.<br>तथापी परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा शासनाच्या परिवीक्षा धोरणानूसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल |
| ६. | | **परिविक्षाधीन कालावधी :**<br>वरिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेली व्यक्ती २ वर्षाच्या कालावधी करीता परिविक्षाधीन राहील. परिविक्षा कालावधी हा नियुक्ती प्राधिकारी कमाल एक वर्षापर्यंत वाढवू शकेल. सदर परिविक्षा कालावधी (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण करणे आणि शासनाच्या परिविक्षा धोरणानूसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.<br>तथापी परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा शासनाच्या परिवीक्षा धोरणानूसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.<br>शासन निर्णय दिनांक २२ जुन २०२१ नुसार परिविक्षाधीन उमेदवारास परिविक्षा कालावधी मध्ये कोणतीही वेतन वाढ अनुज्ञेय असणार नाही. तसेच परिविक्षाधीन कालावधी मध्ये आवश्यक असलेल्या विद्यापीठ विभागीय सेवा-प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण अथवा सूट, संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण अथवा सुट, एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण/सुट प्राप्त करणे आवश्यक राहील त्याशिवाय परिविक्षाधीन कालावधी समाप्त केला जाणार नाही.<br>ज्यावेळी त्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण केल्यामुळे त्यांचे परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याचे आदेश निर्गमित होतील त्यानंतर संबंधीत परिविक्षाधीन उमेदवार वेतनवाढ मिळण्यास पात्र होईल. |
| ७. | | **एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षेबाबतची तरतूद :** |
| | (क) | वरिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, मराठी व हिंदी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमानूसार, एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत (नियुक्ती पासुन ३ वर्षाच्या आत) एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही. |
| ८. | | **संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबतची तरतूद :** |
| | (क) | वरिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमात नमूद केलेल्या विहीत मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहीत मुदतीत प्रमाणपत्र धारण न केल्यास, सदर संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वाषिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही. |

| | |
|---|---|
| ९. | **लहान कुटूंबाच्या प्रतिज्ञापनाबाबतची तरतूद :**<br>वरिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतूदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणा-या नियमांनुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापन सादर करताना त्यामध्ये दोन पेक्षा अधिक अपत्ये नियुक्तीच्या वेळीस हयात असल्यास संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील. तसेच यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित होणारे शासन आदेश लागू राहतील. |
| १०. | **बदलीबाबतची तरतूद :**<br>वरिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीची सेवाजेष्ठता यादी ही विद्यापीठ स्तरावर ठेवण्यात येईल. त्यामुळे सदर व्यक्ती ही विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बदलीसाठी पात्र राहील. |
| ११. | **विद्यापीठ सेवेत प्रवेश केल्यानंतर सेवाविषयक अन्य आदेश / नियम लागू होतील :**<br>विद्यापीठ सेवेतील नियुक्तीसाठी या नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक आहे. सदर नियमांनुसार विद्यापीठ सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, संबंधित कर्मचा-यास, सेवेच्या कालावधीत, महाराष्ट्र नागरी सेवा नियम; तसेच सेवाविषयक बाबीसंदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी अधिनियम/ अधिसुचना/ शासन निर्णय/ शासन आदेशाद्वारे निर्गमित केलेले अन्य नियम लागू राहतील. |

(पु.को.काळे)
कुलसचिव

# वसंतराव नाईक मराठवाडा, कृषि विद्यापीठ, परभणी

## कनिष्ठ संशोधन सहाय्यक संवर्गाचे सरळसेवा/ पदोन्नती प्रवेश नियम (Recruitment Rules) २०२३

| | | |
|---|---|---|
| १. | **संक्षीप्त नाव, प्रारंभ** | |
| | १) | या नियमांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील **कनिष्ठ संशोधन सहाय्यक गट-क सरळसेवा/पदोन्नती प्रवेश नियम २०२३** असे संबोधण्यात यावे. |
| २. | **व्याख्या** – या नियमात संदर्भानूसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर – | |
| | (१) | " **कृषि विद्यापीठ** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ नुसार अधिनियम केलेला आहे,यामाणे असेल. |
| | (२) | " **शासन** " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा विद्यापीठासाठी असलेला मंत्रालय विभाग असा आहे; |
| | (३) | " **गट- क**" याचा अर्थ शासनाकडील गट- **क** मध्ये येणारी पदे असा आहे; |
| | (४) | "**नियुक्ती प्राधिकारी**" याचा अर्थ विद्यापीठ अधिनियम व परिनियमानूसार मा.कुलगुरु, वनामकृवि, परभणी असा आहे. |
| | (५) | " **अधिनियम** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ असा आहे व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | (६) | " **परिनियम** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० असा आहे व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | (७) | " **विद्यापीठ सारसंग्रह** " याचा अर्थ विद्यापीठाने प्रदान केलेल्या अधिकारांची विभागणी व तरतुदी असा आहे व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | (८) | " **कार्यकारी परिषद** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील अधिनियम क्र. ३० व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम क्र.३ मध्ये नमुद परिषद व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | (९) | " **विद्वत परिषद** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील अधिनियम क्र.३३ व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम क्र.४ मध्ये नमुद परिषद व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | (१०) | " **निवड समिती गट-क** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील अधिनियम क्र.५८ व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम क्र. ७५ मध्ये नमुद केल्यानुसार व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह असे असेल. |
| | (११) | " **पदवी** " याचा अर्थ सांविधिक कृषि विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता असा आहे. |
| | (१२) | " **पदव्युत्तर पदवी** " याचा अर्थ सांविधिक कृषि विद्यापीठाची विद्या शाखेची पदव्युत्तर पदवी असा आहे. |
| | (१३) | " **आचार्य पदवी** " याचा अर्थ सांविधिक कृषि विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील आचार्य पदवी असा आहे. |
| | (१४) | " **कृषि परिषद** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ अन्वये स्थापन केलेली महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद असा आहे. |

| | | |
|---|---|---|
| | (१५) | “ **नेट** ” याचा अर्थ केंद्र शासनाने घोषीत केलेली सहायक प्राध्यापक व त्यावरील पदासाठी आवश्यक असलेली राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणारी राष्ट्रीय पात्रता परीक्षा असा आहे. |
| | (१६) | “ **सेट** ” याचा अर्थ राज्य शासनाने घोषीत केलेली सहायक प्राध्यापक व त्यावरील पदासाठी आवश्यक असलेली राज्य पातळीवर घेण्यात येणारी राज्य पात्रता परीक्षा असा आहे. |
| | (क) | **नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीचा मार्ग :-**<br><br>विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने विद्यापीठ निवड समिती गट - क मार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या **उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे** |
| | (एक) | **वयोमर्यादा :**<br>१) **किमान वयोमर्यादा** : १८ वर्ष पुर्ण<br>२) **कमाल वयोमर्यादा** : खुल्या वर्गातील व्यक्तीसाठी ३८ वर्ष पुर्ण व मागासवर्गीय व्यक्तीसाठी ४३ वर्ष पुर्ण<br>३) **महिला**- अराखीव उमेदवारासाठी ३८ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्ष<br>४) **खेळाडू** -उमेदवारासाठी अराखीव ४३ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्ष<br>५) **दिव्यांग**- अराखीव उमेदवारासाठी ४५ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४५ वर्ष<br>६) **अनाथ**- अराखीव उमेदवारासाठी ४३ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्ष<br>६) **वयोमर्यादेची गणना** : जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतीम दिनांकास उपरोक्त प्रमाणे नमूद केलेली किमान व कमाल वयोमर्यादा धारण केलेली असणे आवश्यक राहील.<br>७) शासनाने वेळोवेळी वयोमर्यादेत दिलेली सुट व विद्यापीठ कार्यकारी परिषदेने वेळोवेळी केलेले ठराव व नियम योग्य त्या फेरफारासह लागु राहतील. |
| | (दोन) | **शैक्षणिक अर्हता :**<br>Bachelor’s degree in the respective Faculty (मान्यता प्राप्त कृषि विद्यापीठातील संबंधित शाखेतील पदवी) |
| | (ख ) **पदोन्नतीने नियुक्तीचे मार्ग:** निम्न कृषि सहाय्यक पदवीधर संवर्गातील पदावरुन खालील शैक्षणिक सेवाजेष्ठता, सेवाशर्ती नुसार पात्र ठरणारे कर्मचारी | |
| ३. | **सरळसेवा नियुक्तीचे प्रमाण :-**<br>कनिष्ठ संशोधन सहाय्यक पदाच्या एकूण मंजूर पदसंख्येसाठी, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण हे अनुक्रमे ५० : ५० टक्के असे राहील | |
| | **शैक्षणिक अर्हता:** Bachelor’s degree in the respective Faculty | |
| | **सेवाशर्तींच्या नियम व अटी:** कृषि सहाय्यक पदवीधर गट क संवर्गातील स्थायी पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर ३ वर्षाहून कमी नसेल इतकी सलग नियमीत सेवा झालेल्या, विद्यापीठ विभागीय सेवा-प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण अथवा सूट मिळालेल्या, संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण अथवा सुट मिळालेल्या, एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण/सुट मिळालेल्या व खंड (ख) च्या उप खंड (दोन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करण्या-या व्यक्तीमधून जेष्ठता अधीन पात्रता या निकषावर **योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने;** | |

| | | |
|---|---|---|
| ४. | **विभागीय परीक्षेची तरतूद :-**<br><br>विद्यापीठाने विहित केलेली विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा संबंधित पदावर रुजू झाल्यानंतर ३ संधीमध्ये (मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४ संधीमध्ये) उत्तीर्ण करणे अथवा सुट प्राप्त करणे आवश्यक राहील. विहित कालावधी विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण / सूट प्राप्त न केल्यास संबंधिताच्या विहित संधीनंतर वेतनवाढी शासन नियमानुसार रोखण्यात येतील.<br>तसेच सदर विभागीय परीक्षा संबंधित कर्मचाऱ्याला संबंधित पदावरुन नजीकच्या वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यासाठी एक अर्हता म्हणून घेण्यात येत असल्यामुळे ती उत्तीर्ण / सूट प्राप्त करणे बंधनकारक असेल. तसे केले नसल्यास संबंधिताचा पदोन्नतीकरीता विचार करण्यात येणार नाही.<br>तथापी परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा शासनाच्या परिवीक्षा धोरणानूसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल | |
| ५. | **परिविक्षाधीन कालावधी :**<br><br>कनिष्ठ संशोधन सहाय्यक पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेली व्यक्ती २ वर्षाच्या कालावधी करीता परिविक्षाधीन राहील. परिविक्षा कालावधी हा नियुक्ती प्राधिकारी कमाल एक वर्षापर्यंत वाढवू शकेल. सदर परिविक्षा कालावधी (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण करणे आणि शासनाच्या परिविक्षा धोरणानूसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.<br><br>तथापी परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा शासनाच्या परिवीक्षा धोरणानूसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.<br><br>शासन निर्णय दिनांक २२ जुन २०२१ नुसार परिविक्षाधीन उमेदवारास परिविक्षा कालावधी मध्ये कोणतीही वेतन वाढ अनुज्ञेय असणार नाही. तसेच परिविक्षाधीन कालावधी मध्ये आवश्यक असलेल्या विद्यापीठ विभागीय सेवा-प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण अथवा सूट, संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण अथवा सुट, एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण/सुट प्राप्त करणे आवश्यक राहील त्याशिवाय परिविक्षाधीन कालावधी समाप्त केला जाणार नाही.<br><br>ज्यावेळी त्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण केल्यामुळे त्यांचे परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याचे आदेश निर्गमित होतील त्यानंतर संबंधीत परिविक्षाधीन उमेदवार वेतनवाढ मिळण्यास पात्र होईल. | |
| ६. | **एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षेबाबतची तरतूद :** | |
| | (क) | कनिष्ठ संशोधन सहाय्यक पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, मराठी व हिंदी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमानूसार, एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत (नियुक्ती पासुन ३ वर्षाच्या आत) एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ७. | **संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबतची तरतूद :** | |
| | **(क)** | कनिष्ठ संशोधन सहाय्यक नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमात नमूद केलेल्या विहीत मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहीत मुदतीत प्रमाणपत्र धारण न केल्यास, सदर संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही. |
| ८. | **लहान कुटूंबाच्या प्रतिज्ञापनाबाबतची तरतूद :**<br>कनिष्ठ संशोधन सहाय्यक नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतूदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणा-या नियमांनुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापन सादर करताना त्यामध्ये दोन पेक्षा अधिक अपत्ये नियुक्तीच्या वेळीस हयात असल्यास संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील. तसेच यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित होणारे शासन आदेश लागू राहतील. | |
| ९. | **बदलीबाबतची तरतूद :**<br>कनिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीची सेवाजेष्ठता यादी ही विद्यापीठ स्तरावर ठेवण्यात येईल. त्यामुळे सदर व्यक्ती ही विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बदलीसाठी पात्र राहील. | |
| १०. | **विद्यापीठ सेवेत प्रवेश केल्यानंतर सेवाविषयक अन्य आदेश / नियम लागू होतील :**<br>विद्यापीठ सेवेतील नियुक्तीसाठी या नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक आहे. सदर नियमांनुसार विद्यापीठ सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, संबंधित कर्मचा-यास, सेवेच्या कालावधीत, महाराष्ट्र नागरी सेवा नियम, तसेच सेवाविषयक बाबीसंदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी अधिनियम/ अधिसुचना/ शासन निर्णय/ शासन आदेशाद्वारे निर्गमित केलेले अन्य नियम लागू राहतील. | |

(पु.को.काळे) ७.११.२५

कुलसचिव

# वसंतराव नाईक मराठवाडा, कृषि विद्यापीठ, परभणी

## वरिष्ठ संशोधन सहाय्यक(जैवतंत्रज्ञान) संवर्गाचे सरळसेवा प्रवेश नियम (Recruitment Rules) २०२३

| | | |
|---|---|---|
| १. | **संक्षीप्त नाव, प्रारंभ** | |
| | १) | या नियमांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील **"वरिष्ठ संशोधन सहाय्यक(जैवतंत्रज्ञान)", गट-ब सरळसेवा प्रवेश नियम २०२३** असे संबोधण्यात यावे. |
| २. | **व्याख्या** – या नियमात संदर्भानूसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर – | |
| | २ | " **कृषि विद्यापीठ** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ नुसार अधिनियम केलेला आहे, त्याप्रमाणे असेल. |
| | ३ | " **शासन** " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा विद्यापीठासाठी असलेला मंत्रालय विभाग असा आहे; |
| | ४ | **मंत्रालयीन विभाग**- कृषि व पदूम मंत्रालय, महाराष्ट्र शासना |
| | ५ | " **कृषि परिषद** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ अन्वये स्थापन केलेली महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद असा आहे. |
| | ६ | " **अधिनियम** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ असा आहे व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | ७ | " **परिनियम** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० असा आहे व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | ८ | **"नियुक्ती प्राधिकारी"** याचा अर्थ विद्यापीठ अधिनियम व परिनियमानूसार मा.कुलगुरु, वनामकृवि, परभणी हे आहेत. |
| | ९ | " **कार्यकारी परिषद** " याचा अर्थ म्महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील अधिनियम क्र. ३० व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम क्र.३ मध्ये नमुद परिषद व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | १० | " **विद्वत परिषद** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील अधिनियम क्र.३३ व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम क्र.४ मध्ये नमुद परिषद व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | ११ | " **निवड समिती गट-ब** " याचा अर्थ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील अधिनियम क्र.५८ व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील परिनियम क्र. ७५ मध्ये नमुद केल्यानुसार व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह असे असेल |
| | १२ | " **विद्यापीठ सारसंग्रह** " याचा अर्थ विद्यापीठाने प्रदान केलेल्या अधिकारांची विभागणी व तरतुदी असा आहे व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणासह |
| | १३ | " **पदव्युत्तर पदवी** " याचा अर्थ सांविधिक मान्यता प्राप्त कृषि विद्यापीठातील कृषि शाखेतील जैवतंत्रज्ञान विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असा आहे. |
| | १४ | " **आचार्य पदवी** " याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कृषि आचार्य पदवी असा आहे. |
| | १५ | " **नेट** " याचा अर्थ केंद्र शासनाने घोषीत केलेली राष्ट्रीय पात्रता परीक्षा असा आहे. |
| | १६ | " **सेट** " याचा अर्थ राज्य शासनाने घोषीत केलेली राज्य पात्रता परीक्षा असा आहे. |
| ३. | **नियुक्तीचा मार्ग :-**<br>वरिष्ठ संशोधन सहाय्यक, गट-ब या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल. | |
| | (क) | **नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीचा मार्ग :-**<br>विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने विद्यापीठ निवड समिती गट - ब मार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे गुणवत्तेनूसार शिफारस करण्यात आलेल्या **उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (एक) | **वयोमर्यादा :**<br>१) किमान वयोमर्यादा : १८ वर्ष पुर्ण<br>२) कमाल वयोमर्यादा : खुल्या वर्गातील व्यक्तीसाठी ३८ वर्ष पुर्ण व मागासवर्गीय व्यक्तीसाठी ४३ वर्ष पुर्ण<br>३) महिला- अराखीव उमेदवारासाठी ३८ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्ष<br>४) खेळाडू उमेदवारासाठी अराखीव ४३ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्ष<br>५) दिव्यांग-<br>अराखीव उमेदवारासाठी ४५ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४५ वर्ष<br>अनाथ-<br>अराखीव उमेदवारासाठी ४३ वर्ष व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्ष<br>६) वयोमर्यादेची गणना : जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतीम दिनांकास उपरोक्त प्रमाणे नमूद केलेली किमान व कमाल वयोमर्यादा धारण केलेली असणे आवश्यक राहील.<br>७) शासनाने वेळोवेळी वयोमर्यादेत दिलेली सुट व विद्यापीठ कार्यकारी परिषदेने वेळोवेळी केलेले ठराव व नियम योग्य त्या फेरफारासह लागु राहतील. |
| | | (दोन) | **शैक्षणिक अर्हता :**<br>१) Master's degree in the respective Discipline मान्यता प्राप्त कृषि विद्यापीठातील शाखेतील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण |
| ४. | **सरळसेवा नियुक्तीचे प्रमाण :-**<br>वरिष्ठ संशोधन सहाय्यक संवर्गातील एकूण मंजूर पदसंख्येसाठी, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण हे अनुक्रमे ०० : १०० टक्के असे राहील | | |
| ५. | **विभागीय परीक्षेची तरतूद :-**<br>विद्यापीठाने विहित केलेली विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा संबंधित पदावर रुजू झाल्यानंतर ३ संधीमध्ये (मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४ संधीमध्ये) उत्तीर्ण करणे अथवा सुट प्राप्त करणे आवश्यक राहील. विहित कालावधी विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण / सूट प्राप्त न केल्यास संबंधिताच्या विहित संधीनंतर वेतनवाढी शासन नियमानुसार रोखण्यात येतील.<br>तसेच सदर विभागीय परीक्षा संबंधित कर्मचाऱ्याला संबंधित पदावरून नजीकच्या वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यासाठी एक अर्हता म्हणून घेण्यात येत असल्यामुळे ती उत्तीर्ण / सूट प्राप्त करणे बंधनकारक असेल. तसे केले नसल्यास संबंधिताचा पदोन्नतीकरीता विचार करण्यात येणार नाही.<br>तथापी परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा शासनाच्या परिवीक्षा धोरणानूसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल | | |
| ६. | **परिविक्षाधीन कालावधी :**<br>वरिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेली व्यक्ती २ वर्षाच्या कालावधी करीता परिविक्षाधीन राहील. परिविक्षा कालावधी हा नियुक्ती प्राधिकारी कमाल एक वर्षापर्यंत वाढवू शकेल. सदर परिविक्षा कालावधी (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण करणे आणि शासनाच्या परिविक्षा धोरणानूसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.<br>तथापी परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा शासनाच्या परिवीक्षा धोरणानूसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.<br>शासन निर्णय दिनांक २२ जुन २०२१ नुसार परिविक्षाधीन उमेदवारास परिविक्षा कालावधी मध्ये कोणतीही वेतन वाढ अनुज्ञेय असणार नाही. तसेच परिविक्षाधीन कालावधी मध्ये आवश्यक असलेल्या विद्यापीठ विभागीय सेवा-प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण अथवा सूट, संगणक | | |

| | | |
|---|---|---|
| | अर्हता परीक्षा उत्तीर्ण अथवा सुट, एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण/सुट प्राप्त करणे आवश्यक राहील त्याशिवाय परिविक्षाधीन कालावधी समाप्त केला जाणार नाही.<br>ज्यावेळी त्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण केल्यामुळे त्यांचे परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याचे आदेश निर्गमित होतील त्यानंतर संबंधीत परिविक्षाधीन उमेदवार वेतनवाढ मिळण्यास पात्र होईल. | |
| ७. | **एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षेबाबतची तरतूद :** | |
| | (क) | वरिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, मराठी व हिंदी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमानूसार, एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत (नियुक्ती पासुन ३ वर्षाच्या आत) एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही. |
| ८. | **संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबतची तरतूद :** | |
